361

क्र. जमीन २६८५/१०४१८९/सीआर १३८०/ग९
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक 23 मार्च ८८

विषय :- <u>जमीन-मुंबई उपनगर जिल्हा</u>
सि. स. नं. १०५ अ कुर्ला व १९६ किरोळ
येथील जमीन मुंबई उपनगर विद्युत पुरवठा
कंपनीस सब स्टेशनसाठी मंजूर करणेबाबत.

**ज्ञापन :-**

शासन ज्ञापन क्र. जमीन २६८५/१०४१८९/सीआर १३८०/ग९, दिनांक ७/२/१९८६ च्या संदर्भात आणि अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या पत्र क्र. सी कार्यासन १-जमीन १जे कावि ११३८ दिनांक ३/१०/१९८६ च्या संदर्भात विज्ञप्तिपूर्वक असे कळविण्याचा मला निदेश आहे की, सदर शासन ज्ञापन दिनांक ७/२/१९८६ अन्वये मुंबई विद्युत पुरवठा कंपनीस सब स्टेशनसाठी कब्जेहक्काने देण्यात आलेली सि. स. नं. १०५ अ कुर्ला येथील ३७.१६ चौ. मी. जमीन आणि सि. स. नं. १९६ किरोळ येथील ३७.१६ चौ. मी. जमीन मिळून एकूण क्षेत्र ७४.३२ चौ. मी. मालकी हक्का ऐवजी ३० वर्षांच्या भुईभाड्याने खालील अतिरिक्त अटींवर व नेहमीच्या अटी व शर्तींवर देण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

अतिरिक्त अटी :-

अ] सदर जमीनीची प्रती चौरस मीटरला रु. १३३/- [रुपये एकशे तेहतीस मात्र ] या तात्पुरत्या किंमतीनुसार होणाऱ्या संपूर्ण किंमतीच्या ८ टक्के दराने सध्या भाडेपट्टा आकारण्यात यावा.

ब] वर नमूद केल्याप्रमाणे तात्पुरती किंमत व सदर जमीनीची आजच्या बाजार भावानुसार होणारी अंतिम किंमत या प्रमाणे होणारा भाडेपट्टा यातील फरकाची रक्कम ८ टक्के व्याजासह जमिनीचा ताबा दिलेल्या दिनांकापासून विद्युत पुरवठा कंपनीकडून वसूल करण्यात यावी. व त्याप्रमाणे फरकाची रक्कम ८ टक्के व्याजासह भरण्यास तयार असल्याबाबत तसे हमीपत्र कंपनीकडून लिहून घ्यावे.

क] <u>भाडेपट्ट्यामध्ये दर दहा वर्षांनी सुधारणा करण्यात येईल व त्याप्रमाणे सुधारित भाडेपट्टीची रक्कम भरणे अधिग्रहीता वर बंधनकारक राहील.</u>

२. आगाऊ ताबा दिलेल्या जमिनीचा ताब्याशी वरील व्याजाचा दर निश्चित करण्याबाबत व ज्या जमिनी भाडेपट्ट्याने देण्यात आल्या आहेत. त्यांचे भुईभाडे निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. त्यामध्ये शासन

PI

OFFICE OF THE ADDITIONAL COLLECTOR BOMBAY SUBURBAN DIST. Date 23/3/88

4521.

..२..

जो निर्णय घेईल तो याप्रकरणी देखील लागू होईल. त्या निर्णयाप्रमाणे भाडेपट्ट्याच्या रकमेत जरूर तर सुधारणा करणे आवश्यक झाल्यास ती सुधारणा करून नवीन भाडेपट्ट्याची रक्कम निश्चित केली जाईल. व त्याप्रमाणे जमिनीचा ताबा दिल्यापासून फरकाची रक्कम व्याजासह कंपनीला द्यावी लागेल असे लेखी हमीपत्र कंपनीकडून करून घ्यावे. व भाडेपट्ट्याचा योग्य तो करार करून घ्यावा.

३. सदर जमिनीचे प्रचलित बाजार भावाचे मूल्यांकन नगर रचना व मूल्य-निर्धारण विभाग मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून करून घेऊन ते शासनाच्या मंजुरीसाठी तात्काळ पाठवावे.

४. शासन ज्ञापन दिनांक ७/२/१९८६ मध्ये घालण्यात आलेल्या जमीन प्रदान आदेशातील इतर अटी व शर्ती तशाच राहतील.

५. हे ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक तीआर ४६ –व्यय-९, दिनांक १८/१/१९८८ ला अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[signature]

[रा. वा. आडिवरेकर]
कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,
अपर जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

आयुक्त कोकण विभाग, कोकण भवन, यांना त्यांचे पत्र क्र. आरबी/डेस्क-२-एलएनडी [१] ३१०८, दि. २९/१०/१९८७ ला अनुसरून अग्रेषित.

महालेखापाल महाराष्ट्र राज्य-२ नागपूर
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग [एनआरजी ४०]
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग / [का. ७]
नगर विकास विभाग-[न. वि. ५]
वित्त विभाग व्यय-९
निवड नस्ती ग९ कार्यासन, महसूल व वन विभाग.

Scanned by CamScanner

क्रमांक :- सी-जमीन-१-बिन-शे-आर-१३८

अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय,
मुंबई उपनगर जिल्हा, दुसरा मजला
जुने जकात घर, मुंबई ४०० ०२३

दिनांक : १६ ऑगस्ट १९८८.

वाचा :- १) शासन, महसूल व वन विभाग शासन क्रमांक जमिन-२८८५-१०४१८९-सीआर-१३८०-ज-८ दिनांक २२.२.१९८८

२) उप मुख्य अभियंता, मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी लि. पत्र क्र. सी-७०८५-८८ दिनांक २०.७.८८ चे हमीपत्र [ रक्कम रुपये ५/- चे स्टँप पेपरवर. ]

- आ दे श -

वरील नमूद केलेल्या क्रमांक १ आणि २ ला अनुसरून मौजे कुर्ला तालुका कुर्ला येथील सिटी सर्वे नंबर १०५ व येथील ३७.१४ चौ.मी. आणि मौजे किरोल सिटी सर्वे नंबर १९६ पैकी ३७.१८ चौ.मी. एकूण मिळून ७४.३२ चौ.मी. जेवढी जमिन मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीस सब स्टेशन उभारण्यासाठी ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने खालील शर्तीवर देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

१) सदर जमिनीची प्रति चौ. मीटरला १३२/- रुपये ( रुपये एकशे बत्तीस ) प्रमाणे तात्पुरती किंमत आकारून तात्पुरत्या किंमतीच्या ८% दराने भाडेपट्टा वसूल करण्यात यावा. म्हणून कंपनीने वार्षिक तात्पुरता भाडेपट्टा रक्कम रुपये ८९८.०० ( रक्कम आठशे अठ्ठ्याण्णव ) भरावा.

२) वर नमूद केल्याप्रमाणे तात्पुरती किंमत व सदर जमिनीची आकाराच्या मानानुसार होणारी अंतिम किंमत यानुसार होणारा भाडेपट्टा वसूल करण्याची रक्कम ८% व्याजासह कंपनीने भरावे. [ तसे हमीपत्र दिनांक २०.७.१९८८ रोजी कंपनीने दिले आहे. ]

३) ज्या जमिनी भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या आहेत त्यांचे मुंबईकडे नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. त्यामध्ये जो निर्णय होईल तो या प्रकरणी देखील लागू राहील व त्याप्रमाणे भाडेपट्ट्याची रक्कम आकारण्यात यावी.

४) भाडे पट्ट्यामध्ये दर १० वर्षांनी फेर आकारणी करण्यात येईल.

५) कंपनीने सदर जमिनीचा उपयोग प्रयोजनाकरिता ज्या

प्रयोजनासाठी किती आहे त्याचे स्पष्टीकरण करावे.

६) प्रस्तावित जमिनीवर किंवा तीच्या लगतच्या भाग कारखाना या सेवी पुर्व तयारी स्थिरावर निश्चित स्थिती, नैऋत्य व महत्व करुन घ्यावे.

७) मुंबई शहराच्या मंजूर विकास योजनेमध्ये त्याचप्रमाणे सुधारीत विकास योजनेच्या आराखड्यात प्रस्तावित जागा कोणत्या साठी आरक्षित आहे. आराखड्यातील जागेमध्ये दुसरा वापर अनुज्ञेय नाही. परंतु विद्युत उपकेंद्र हे सार्वजनिक सुविधा असल्याने व मुंबई सबर्बन इलेक्ट्रीक सप्लाय कंपनीची जमिनीची गरज फक्त ७५०.३२ चौ.मी. इतकी असल्याने उपरोक्त जमीनीत आरक्षित जागेच्या एकूण क्षेत्रापैकी ७५०.३२ चौ.मी. इतकी जमिन विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी देण्यात येत आहे. ऐसे सदर उर्वरित जागा आरक्षित उद्देशासाठी महानगरपालिकेस वापरता येईल.

८) सदर जमिनीची मंजूरी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ व महाराष्ट्र जमिन महसूल ( सरकारी जमिनीची विल्हेवाट ) नियम १९७१ मधील तरतुदींच्या अधिन राहून त्यातील दंडात्मक अटी व शर्तीच्या आणि उपरोक्त नमूद केलेल्या विशेष शर्तीच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

सही/- १९९८

अप्पर जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

एस. पी. करंदीकर,
उप मुख्य अभियंता,
मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी लिमिटेड,
तळमजला बिल्डींग, पोस्ट बॉ. क्र. ६८०८
कोपडीकर मार्ग, सांताक्रूझ (पूर्व)
मुंबई ४०० ०५५

आपणांस विनंती करण्यात येते की, कृपया जमिनीचा ताबा घेण्यासाठी आपण आपल्या प्रतिनिधी मार्फत जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा जुने जकात घर, फोर्ट, मुंबई ४०० ०२३ यांचेकडे संपर्क साधावा. ताबा देणे पूर्वी मोजणी सरहद्द आखणीसाठी रक्कम रुपये ८८८.००(आठशे अठ्ठ्याऐंशी) तहसिलदार यांचेकडे भरणा करावी.

Scanned by CamScanner

प्रत : जिल्हा निरीक्षक व भूमि अभिलेख व मुंबई उपनगर जिल्हा, जुने जकात घर, यांचेकडे कंपनीचे प्रतिनिधीस संबंधित जागेवर ताबा देण्यास रवाना.

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, कंपनीने तात्पुरत्या भाडेपट्टयाची रक्कम रुपये ८९८.०० तहसिलदार कुर्ला यांचेकडे भरले आहे याची खात्री करुन मंजूर जमिनीवर ताबा देण्यात यावा व ताब्याची तारीख कळवावी व मोजणी नकाशा दोन प्रतीत सादर करावा.

प्रत : तहसिलदार कुर्ला, (मुलुंड) मुंबई ४०० ०८० यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

२/- मुंबई विद्युत पुरवठा कंपनीकडून वार्षिक तात्पुरती भाडेपट्टा रक्कम रुपये ८९८.०० वसूल करावी आणि तदनंतर आपले मंडळ निरीक्षक ताबा देतेवेळी हजर राहण्याची समज द्यावी. ताबा दिले अंती आपल्या दप्तरी अद्यावत नोंद घ्यावी व नकाशा-या प्रतीत गावचे अभिलेखात दुरुस्ती करुन घ्यावयाचा.

प्रत : नगर भूमापन अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे माहिती साठी रवाना.

प्रत : मे. सचिव, महसूल व वन विभाग म-१ यांचे कडील शासन निर्णय दिनांक २३ मार्च ८८ ला अनुसरुन माहितीसाठी सविनय सादर.

प्रत : मा. आयुक्त, कोकण विभाग नवी मुंबई यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

स्थळप्रतीवर अपर जिल्हाधिकारी
यांची सही असे

अपर जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरिता

मेनाप- ५८८८